लोकमत


'बेगोनिया बाचूळ्करी' असे नामकरण : एस. आर. यादव, मकरंद ऐतवडे यांचे संशोधन; पश्चिम घाटातील शोभिवंत वनस्पती

# 'बेगोनिया'च्या नवीन जातीस मधुकर बाचूळ्कर यांचे नाव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पश्चिम घाटातील शोभिवंत वनस्पती बेगोनिया प्रजातींचा अभ्यास करताना कोल्हापुरातील ज्येष्ठ वनस्पतितज्ज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव आणि छत्रपती शहाजी महाविद्यालयातील वनस्पती विभागप्रमुख डॉ. मकरंद मो. ऐतवडे यांना केरळमधील निलयमपत्ती, पलक्कड या ठिकाणी डिसेंबर २०१२ साली बेगोनियाची एक जात आढळून आली. या प्रजातीस वनस्पतितज्ज्ञ प्रा. डॉ. मधुकर बाचूळ्कर यांचे नाव देण्यात आले 'बेगोनिया बाचूळ्करी' अशी या प्रजातीची ओळख असेल.

बेगोनिएसी कुळातील बेगोनिया या जातीतील वनस्पती जगभरात शोभिवंत वनस्पती म्हणून सर्वज्ञात आहेत. जगभरात बेगोनियाच्या १० हजार जाती लागवडीखाली आहेत. याबरोबरच त्यांचे अनेक जंगली, लागवडीखालील आणि संकरित वाण शोभिवंत, खाद्य आणि औषधी गुणधर्मांचे आहेत. सर्व संदर्भांचा आढावा घेतल्यानंतर भारतासाठी बेगोनिएसी कुटुंबामध्ये बेगोनिया ही एकच प्रजात असून, त्यात साधारणपणे ६७ जाती नोंद आहेत, असे लक्षात येते. पश्चिम घाटातील बेगोनियाच्या जाती मर्यादित ठिकाणीच आढळतात. त्यातील बहुतांश जाती ( पान ४ वर)



## 'बेगोनिया बाचूळ्करी'ची वैशिष्ट्ये

खोड जमिनीखाली रुपांतरित मूलक्षोड स्वरुपात, आकर्षक फुलोरे आणि गुलाबी फुले, मर्यादित ठिकाणीच अस्तित्व, फुले व फळे नोव्हेंबर ते एप्रिलदरम्यान येतात.




वनस्पतिशास्त्रातील मी केलेल्या कार्याची दखल घेऊन डॉ. यादव आणि ऐतवडे यांनी 'बेगोनिया'च्या नवीन जातीस माझे नाव देऊन माझा मोठा सन्मान केला आहे. आपल्या देशात वनस्पतींमध्ये मोठी विविधता आहे. त्याबाबत नवसंशोधक, अभ्यासकांनी संशोधन करावे.

- डॉ. मधुकर बाचूळ्कर, ज्येष्ठ वनस्पतितज्ज्ञ



प्रा. डॉ. एस. आर. यादव व डॉ. मकरंद मो. ऐतवडे यांना केरळमधील निलयमपत्ती, पलक्कड या ठिकाणी डिसेंबर २०१२ साली बेगोनियाची एक जात आढळून आली.



पश्चिम घाटातील वनस्पतींच्या संवर्धनासाठी आम्ही अनेक यशस्वी प्रकल्प राबविले आहेत. लुप्त होत चाललेल्या बेगोनियाच्या जातींचे संरक्षण, संवर्धनासाठी प्रयत्न करणार आहोत.

- प्रा. डॉ. एस. आर. यादव



ही वनस्पती व्यावसायिकदृष्ट्या शोभिवंत म्हणून प्रसिद्धीस आणि प्रसारित होऊ शकते. यासाठी त्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करणार आहोत.

- डॉ. मकरंद ऐतवडे

लोकमत

# नवीन जातीस मधुकर बाचूळकर यांचे नाव

( पान १ वरुन) प्रदेशनिष्ठ आहेत, तर काही लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. याबाबत यादव व ऐतवडेकर यांनी सखोल अभ्यास केल्यानंतर ही जात 'बेगोनिया फ्लोसिफेरा' या जातीशी आप्तभाव दर्शविते असे आढळून आले. त्याबाबतचा शोधनिबंध न्यूझीलंडमधील 'फायटोटॅक्सा' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये नुकताच प्रसिद्ध झाला.

'बेगोनिया बाचूळकरी' साधारणपणे ५०-६० सेंटीमीटर उंच असून, ती ओलसर ठिकाणी दमट हवामानात दगडांच्या फटींमध्ये वाढते. या वनस्पतीस जमिनीच्या वर खोड नसून ते रुपांतरित मूलक्षोड स्वरुपात जमिनीखाली आढळते. ही वनस्पती संकलित करण्यासाठी थ्रिसूर, केरळ येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषद- राष्ट्रीय पादप आनुवंशिक संसाधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. जोसेफ कट्टूकुनेल यांची मदत झाली. या संशोधनामध्ये डॉ. शरद कांबळे, रोहित माने, जगदीश दळवी यांचे सहकार्य लाभले. डॉ. बाचूळकर यांनी गेली अनेक वर्षे वनस्पती वर्गीकरणशास्त्र, जैवविविधतेचे जतन आणि पर्यावरणाचे संरक्षण या क्षेत्रात काम केले आहे. या त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून 'बेगोनिया बाचूळकरी' हे नाव देण्यात आहे, असे प्रा. यादव आणि डॉ. ऐतवडे यांनी सांगितले.

Hello Kolhapur
Page No. 4 Nov 23, 2019
Powered by: erelego.com

# बेगोनियाच्या नव्या प्रजातीला डॉ. बाचूळकर यांचे नाव

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



प्रा. डॉ. मधुकर बाचूळकर

बेगोनिया या दुर्मिळ शोभिवंत वनस्पतीच्या दुसऱ्या नवीन जातीचा शोध लागला असून पश्चिम घाटातील केरळ राज्यातून शोधलेल्या या प्रजातीला ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ व या संशोधन मोहिमेतील संशोधक डॉ. मधुकर बाचूळकर यांच्या नावाने 'बेगोनिया बाचुळकरी ' असे नामकरण करण्यात आले आहे.



बेगोनिया वनस्पती

प्राचार्य डॉ. मधुकर बाचूळकर यांच्या वनस्पतीशास्त्र व पर्यावरण क्षेत्रातील कार्याच्या गौरवार्थ बेगोनियाच्या या जातीस त्यांचे नाव देण्यात आले. बेगोनियाची ही नवीन जात प्रा. डॉ. बाचूळकर यांच्या नावाने ओळखली जाणार आहे. गेली अनेक वर्ष त्यांनी वनस्पती वर्गीकरणशास्त्र, जैवविविधतेचे जतन आणि पर्यावरणाचे संरक्षण या क्षेत्रात काम केले आहे. या त्यांच्या कार्यांचा गौरव म्हणून 'बेगोनिया बाचूळकरी' हे नाव देण्यात आले आहे, असे डॉ. मकरंद ऐतवडे आणि प्रा. डॉ. एस.आर. यादव यांनी सांगितले.

## बेगोनियाच्या नव्या जातीच्या संशोधनावर शिक्कामोर्तब

पश्चिम घाटातील बेगोनिया प्रजातींचा अभ्यास करत असताना वनस्पती अभ्यासक डॉ. मकरंद ऐतवडे आणि वनस्पती तज्ज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना केरळमधील निलयमपत्ती, पलक्कड याठिकाणी डिसेंबर २०१२ साली बेगोनियाची एक जात आढळून आली. या वनस्पतीचा सखोल अभ्यास केल्यानंतर ही जात नवीनच असून पश्चिम घाटातील 'बेगोनिया फ्लोसिफेरा' या जातीशी आप्तभाव दर्शविते असे आढळून आले. या नवीन जातीच्या शोधाबाबतचा शोधनिबंध न्यूझीलंडमधून प्रकशित होणाऱ्या 'फायटोटॅक्सा' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये नुकताच प्रसिद्ध झाला.


'बेगोनिया बाचूळकरी' ही वनस्पती साधारणपणे ५० ते ६० से. मी. उंच असून ती ओलसर ठिकाणी दमट हवामानात दगडांच्या फटींमध्ये वाढते. या वनस्पतीस जमिनीच्या वर खोड नसून ते रूपांतरित मूलक्षोड स्वरूपात जमिनीखाली आढळते. ही वनस्पती गोळा करण्यासाठी त्रिसूर, केरळ येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद-राष्ट्रीय पादप अनुवंशिक संसाधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. जोसेफ कट्टुकुनेल यांची मदत झाली. या संशोधनामध्ये डॉ. शरद कांबळे, रोहित माने आणि जगदीश दळवी यांचे सहकार्य लाभले.

“



बेगोनिया बाचुळकरी या वनस्पतीची पाने आकर्षक आणि फुले देखणी आहेत. . ही वनस्पती व्यावसायिकदृष्ट्या शोभिवंत म्हणून प्रसिद्धीस आणि प्रसारीत होऊ शकते यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत.

– डॉ. मकरंद ऐतवडे



पश्चिम घाटातील वनस्पतींच्या संवर्धनासाठी आम्ही अनेक यशस्वी प्रकल्प राबविले आहेत. लुप्त होत चाललेल्या बेगोनियाच्या पश्चिम घाटातील जातींचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.'

– डॉ. एस.आर. यादव





बेगोनिया बाचूळकरी.

# ‘बेगोनिया’ला बाचूळकरांचे नाव

## ‘बेगोनिया बाचूळकरी’ असे नामकरण; केरळमध्ये शोधली शोभिवंत जात

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : जगभरात शोभिवंत वनस्पती म्हणून ओळखली जाणारी बेगोनिएसी या कुळातील बेगोनिया ही वनस्पती पश्चिम घाटातही आढळते आहे. बेगोनिया प्रजातींचा अभ्यास करत असताना वनस्पती अभ्यासक डॉ. मकरंद ऐतवडे आणि वनस्पतितज्ज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना केरळमधील निलयमपत्ती, पलक्कड येथे डिसेंबर २०१२ साली बेगोनियाची एक जात आढळून आली. बेगोनियाची ही नवीन जात प्रा. डॉ. मधुकर बाचूळकर यांच्या नावाने ओळखली जाणार आहे.

भारतात बेगोनिएसी कुटुंबामध्ये बेगोनिया ही एकच प्रजात असून त्यात ६७ जाती नोंद आहेत. सर्वाधिक जाती हिमालयामध्ये आणि इतर पश्चिम घाटामध्ये आढळतात. त्यातील बहुतांश जाती प्रदेशनिष्ठ तर काही लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. या वनस्पतीचा अभ्यास केल्यानंतर ही जात नवीनच असून पश्चिम घाटातील बेगोनिया फ्लोसिफेरा या जातीशी आप्तभाव दर्शवते, असे आढळले. याबाबतचा शोधनिबंध न्यूझीलंडमधून प्रकशित होणाऱ्या फायटोटॅक्सा या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रसिद्ध झाला. पश्चिम घाटातील केरळमधून शोधलेल्या या वनस्पतीचे नामकरण ‘बेगोनिया बाचूळकरी’ असे केले.

ही वनस्पती ५० ते ६० सेंमी उंच असून ती ओलसर ठिकाणी दमट हवामानात दगडांच्या फटींमध्ये वाढते. अगदी सुरुवातीला या वनस्पतीच्या सर्वांगावर पिवळसर चॉकलेटी रोम पाहावयास मिळतात. पुष्पविन्यास हा द्विशाखी, फांद्यांच्या बगलेत येत असून त्याची लांबी २० ते ५० सेमी असते.

ही वनस्पती गोळा करण्यासाठी थ्रिसूर, केरळ येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषद- राष्ट्रीय पादप अनुवंशिक संसाधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. जोसेफ कट्टुकुनेल यांची मदत झाली. संशोधनामध्ये डॉ. शरद कांबळे, रोहित माने आणि जगदिश दळवी यांचे सहकार्य मिळाले.

### बेगोनिया बाचूळकरीची वैशिष्ट्ये

- खोड जमिनीखाली रूपांतरित मूलक्षोड स्वरूपात
- आकर्षक फुलोरे आणि गुलाबी फुले
- फुलोऱ्यामध्ये नर फुले प्रथम येतात
- नर आणि मादी फुलांमध्ये गोलाकार पाकळ्या
- मूलक्षोडाद्वारे शासकीय प्रजनन शक्य
- मर्यादित ठिकाणीच अस्तित्व



“ बेगोनिया बाचूळकरी या वनस्पतीची पानं आकर्षक आणि फुल देखणी आहेत. ही वनस्पती व्यावसायिकदृष्ट्या शोभिवंत म्हणून प्रसारीत होऊ शकते. यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. जेणेकरून ही जात संकटग्रस्त न होता तिचे जतन आणि संवर्धन होईल.

\- डॉ. मकरंद ऐतवडे



“ नैसर्गिक संकटांमुळे अनेक वनस्पतींच्या जाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. पश्चिम घाटातील वनस्पतींच्या संवर्धनासाठी आम्ही अनेक यशस्वी प्रकल्प राबविले आहेत. बेगोनियाच्या पश्चिम घाटातील जातीचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

\- डॉ. श्रीरंग यादव

# ई पेमेंटसाठी सुरक्षित प्रणाली

कोल्हापूर टाइम्स टीम

## अरूंधती सिन्हा यांचे प्रतिपादन



'डिजिटल पेमेंट, कार्ड पेमेंट या बरोबरच मोबाइल बँकींगच्या मागणीमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली वाढ ही ग्राहकांच्या मागणीबरोबरच काळाची गरज बनलेली आहे. त्यामुळे आवश्यक त्या पायाभूत सुविधांमध्ये बळकटी आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी आरबीआय एक सुरक्षित प्रणाली तयार करत आहे', असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया विभागीय कार्यालय मुंबई येथील सहाय्यक महाव्यवस्थापक अरूंधती सिन्हा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांच्या संयुक्त विद्यमाने 'ई-पेमेंट व सायबर घोटाळे' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये करण्यात आले होते. यावेळी सिन्हा बोलत होत्या. कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी आरबीआय मुंबई येथील विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक अंकुर सिंग, बँक ऑफ इंडिया कोल्हापूरचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सिन्हा म्हणाल्या, 'नव्या तंत्रप्रगत बँकींग व्यवस्थेचा ई पेमेंट हा भाग असुन त्याबाबत जनजागृती करण्याचे काम रिझर्व्ह बँकेने हाती घेतले आहे. यासाठी तीन वर्षांचा आराखडा तयार केला असून सुरक्षित, खात्रीशीर, परवडणारी ई देय प्रणाली करीत असताना खर्च घट, स्पर्धावाढ, सोयीस्करता व विश्वसनीयता हे चार महत्वाचे घटक आहेत. ग्राहकांना जलदगतीने, सुरक्षितपणे आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यासाठी ई-पेमेंटची व्यापकता वाढविण्याचे काम सुरू आहे. पुढील काळात अद्ययावत तंत्रज्ञानामुळे बँकींग आणि वित्त क्षेत्रामध्ये अमूलाग्र बदल होणार आहेत. सुरक्षित आर्थिक व्यवहारांमध्ये जलदता आणण्यासाठी संपूर्ण बँकींग उद्योगांसह अन्य पेमेंट सिस्टम ऑपरेटर्सनाही या प्रणालीबाबत सहकार्य करण्याची आवश्यकता आहे.'

डॉ. नांदवडेकर म्हणाले, 'सायबर गुन्ह्यांकडे गंभीरतेने व सातत्याने लक्ष देणे आवश्यक आहे. इंटरनेटच्या माध्यमातून जगामध्ये बँकींग व्यवहारामध्ये काही चुकीच्या आणि गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना घडत आहेत. त्यासाठी बँक, वित्त आणि ऑनलाइन, डिजिटल व्यवहारांमध्ये सायबर सुरक्षा अधिक सक्षम करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ग्राहकांनीही कोणत्याही प्रकारच्या अमिशाला बळी न पडता जागरूकतेने व्यवहार केले पाहिजेत.'

याप्रसंगी बँक ऑफ इंडिया लिड बँकेचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी.सी. तळुले यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया चेअर इन रूरल बँकींगचे समन्वयक डॉ.व्ही.बी.ककडे यांनी स्वागत केले. यावेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.जे.एफ.पाटील, अनिल पाटील यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थीनी, शिक्षक, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

लोकमत

## जम्मू, मुंबई, लाला लजपतराय विद्यापीठाची आघाडी; कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

# शिवाजी विद्यापीठास पराभवाचा धक्का

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक' टी-२० क्रिकेट स्पर्धेत शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाला पराभवाचा धक्का बसला. विद्यापीठाच्या संघाला हिस्सार (हरयाणा) येथील लाला लजपतराय विद्यापीठाच्या संघाने १३९ धावांनी पराभूत केले. जम्मू विद्यापीठाने पतियाळा येथील पंजाब विद्यापीठाला २७ धावांनी हरविले. मुंबई विद्यापीठाच्या कर्मचारी जिमखाना संघाने अजमेरच्या एम. डी. एस. युनिव्हर्सिटीवर नऊ गडी राखून विजय मिळविला.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाने या स्पर्धेचे संयोजन केले आहे. येथील राजाराम महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर शिवाजी विद्यापीठ आणि लाला लजपतराय विद्यापीठात सामना झाला. त्यात प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत पाच बाद २३८ धावा केल्या. त्यांच्या सतबीर शर्मा यांनी ७८, अनिल कुमार ५७, तर विकास ठाकूर यांनी ३६ धावा केल्या. गोलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठाच्या संघाकडून योगेश दळवी यांनी दोन, तर विश्वनाथ वरुटे यांनी एक बळी घेतला. त्यांनी अनुक्रमे ३२ आणि ३७ धावा दिल्या. उत्तरादाखल खेळताना शिवाजी विद्यापीठाचा खेळ २० षटकांत नऊ बाद ९९ धावांवर आटोपला. त्यात विक्रम कोंडावळे यांनी २५ आणि रमेश ढोणुक्षे यांनी ३४ धावा केल्या. लाला लजपतराय विद्यापीठाच्या सतबीर शर्मा यांनी दोन आणि संदीप यांनी तीन बळी घेतले. शिवाजी विद्यापीठाकडून क्षेत्ररक्षणात चार झेल सुटले. त्याचा फटका या संघाला बसला.

विद्यापीठाच्या पॅव्हेलियन क्रीडांगणामधील सामन्यात प्रथम फलंदाजी करताना जम्मू विद्यापीठाने २० षटकांत पाच बाद १७० धावा केल्या. त्यांच्या विशाल सुदन यांनी नाबाद ६०, राजेश सल्होत्रा यांनी ३५, तर अमनसिंग यांनी नाबाद २८ धावा केल्या. पंजाब विद्यापीठाकडून हरप्रीतसिंग, गुरप्रीतसिंग यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. उत्तरादाखल खेळताना पंजाबी विद्यापीठाचा खेळ २० षटकांत ८ बाद १४३ धावांमध्ये गुंडाळला. त्यात दीपक सिंग यांनी नाबाद ५० आणि प्रीतपाल सिंग यांनी ३४ धावा केल्या. गोलंदाजी करताना जम्मू विद्यापीठाच्या मोहंमद इलियास यांनी चार बळी घेतले. ॲथलेटिक्स क्रीडांगणावर मुंबई विद्यापीठाच्या संघाने अजमेरच्या एम. डी. एस. युनिव्हर्सिटीच्या संघावर नऊ गडी राखून विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना एम. डी. एस. युनिव्हर्सिटीने १९.१ षटकांत दहा बाद ८६ धावा केल्या. त्यांच्या नीरज पनवार यांनी १९ चेंडूंत २० धावा केल्या. मुकेश मीना यांनी १६ चेंडूंत १० धावा केल्या. मुंबई विद्यापीठाकडून गोलंदाजी करताना विपुल खांदारे यांनी चार, तर गजानन गुसिंगे यांनी दोन बळी घेतले. उत्तरदाखल खेळताना मुंबई विद्यापीठाने ५.४ षटकांत एक बाद ८९ धावा करीत विजय मिळविला. त्यांच्या विपुल खांदारे यांनी २३, हृषिकेश काळे यांनी नाबाद ५१ धावा केल्या. काळे यांनी आठ चौकार आणि तीन षटकार मारले. गोलंदाजी करताना योगेश मीना यांनी १३ धावा देत एक बळी घेतला. दरम्यान, दुपारच्या सत्रातील सामन्यात शेर-ए-काश्मीर विद्यापीठ ॲग्रिकल्चर सायन्सने जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला ३५ धावांनी हरविले. लुधियाना विद्यापीठाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर १० धावांनी निसटता विजय मिळविला. चंदीगढ विद्यापीठाने सिमला विद्यापीठाच्या संघाला ८० धावांनी पराभूत केले.

## आजचे सामने

- पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना वि. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (स. ८.३० वा.)
- जम्मू विद्यापीठ, जम्मू वि. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला (स. ८.३० वा.)
- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विरुद्ध दीनदयाल उपाध्याय गोरखपूर विद्यापीठ, गोरखपूर (स. ८.३० वा.)
- महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर वि. पंजाब विद्यापीठ, पतियाळा (दु. १ वा.)
- पंजाब विद्यापीठ, चंदीगढ वि. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी (दु. १ वा.)
- केंद्रीय विद्यापीठ, जम्मू वि. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (दु. १ वा.)

## शर्मा, सुदन, खांदारे ठरले 'सामनावीर'

७८ धावा करणारा आणि १६ धावांमध्ये दोन बळी घेणारा सतबीर शर्मा (लाला लजपतराय विद्यापीठ), नाबाद ६० धावा करणारा विशाल सुदन (जम्मू विद्यापीठ), चार षटकांत १८ धावा देत चार बळी घेणारा आणि १६ चेंडूंमध्ये २३ धावा करणारा विपुल खांदारे (मुंबई विद्यापीठ) हे शुक्रवारी विविध सामन्यांमधील 'सामनावीर' ठरले.

पुढारी



कोल्हापूर : अ.भा. कबड्डी स्पर्धेसाठी पात्र शिवाजी विद्यापीठाचा कबड्डी संघ.

# शिवाजी विद्यापीठ पुरुष कबड्डी संघ अ. भा. स्पर्धेसाठी पात्र

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

अजमेर विद्यापीठाचा पराभव करून कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष कबड्डी संघाने पश्चिम विभागीय स्पर्धेतील अव्वल साखळी फेरीत प्रवेश केला. यामुळे शिवाजी विद्यापीठासह मुंबई, कोटा व गोंडवाना या विद्यापीठांचे संघ अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. शिवाजी विद्यापीठाने सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली आहे.

राजस्थानमधील कोटा येथे खेळल्या जात असलेल्या प. विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत गतवर्षीच्या मानांकित शिवाजी विद्यापीठ पुरुष संघाचा सामना अजमेर विद्यापीठाशी खेळला गेला.

ऋषिकेश देसाईच्या नेतृत्वाखालील शिवाजी विद्यापीठाने ४२-२४-२४ असा जिंकला. दुसऱ्या चुरशीच्या सामन्यात गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठाने नेत्रदीपक विजय मिळविला.

शिवाजी विद्यापीठ संघात ऋषिकेश देसाई, सौरभ पाटील, सौरभ कुलकर्णी, प्रतीक पाटील, योगेश पाटील, अविनाश पाटील, शुभम पाटील, मनोज नार्वेकर, गुरुराज घोडके, निखिल सूर्यवंशी, सौरभ वगरे, सौरभ बा. पाटील या खेळाडूंचा समावेश आहे. त्यांना प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडिगिरी व प्रा. जहांगीर तांबोळी यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# प्रौढांच्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा उद्या

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

येथील लक्ष्य मास्टर्स फाऊंडेशनतर्फे प्रौढांसाठी जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (दि. २४) सकाळी ७ वाजल्यापासून, शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर ही स्पर्धा होईल. स्पर्धेत ३५ ते १०० वयोगटातील स्पर्धक सहभागी होतील.

स्पर्धेत ५ कि. मी. चालणे, १००, २००, ४००, ८००, १५०० व ३००० मीटर धावणे, उंच व लांब उडी, गोळा-थाळी-भाला फेक असे विविध क्रीडा प्रकार असणार आहेत. विजयी खेळाडूंची निवड सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तर स्पर्धेसाठी होणार आहे.

सहभागी होणाऱ्यांनी अधिक माहिती व नावनोंदणीसाठी प्रसाद मोटर्स, राजारामपुरी नववी गल्ली, डोसा एक्स्प्रेस बिनखांबी गणेश मंदिर येथे संपर्क साधण्याचे आवाहन संयोजक अध्यक्षा संयुक्त जाधव, अभिजित मस्कर, नासर खान, कृष्णा शेट्टी, सुनील शेंडगे, सतीश पाटील यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

पुढारी

संक्षिप्त

# विद्यापीठात सोमवारी 'डॉ. आंबेडकर व भारतीय संविधान' विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने संविधान दिनानिमित्त सोमवारी (दि.२५) सकाळी १०.३० वाजता मानव्य शास्त्र सभागृह येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. लेखक, विचारवंत डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानाला सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

# विद्यापीठात आज राज्यस्तरीय योग, निसर्गोपचार परिषद

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने शनिवार (दि. २३) रोजी वि. स. खांडेकर भाषा भवन येथे राज्यस्तरीय योग व निसर्गोपचार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेत योग व निसर्गोपचार या विषयावर व्याख्यान होणार असून, प्रात्यक्षिके दाखविली जाणार आहेत. ॲक्युप्रेशर व आहारशास्त्र विषयावरही मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी पेपरचे सादरीकरण केले जाणार आहे. परिषदेस उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

Kolhapur Edition
23 Nov, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

# शिवाजी विद्यापीठातील संशोधनाला मिळाली चालना

## आजवर ११८ राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून विद्यापीठाचा आंतरराष्ट्रीय दर्जा उंचाविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. त्याचा एक भाग म्हणून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ज्ञानाचा लाभ येथील विद्यार्थी आणि प्राध्यापकांना व्हावा, यासाठी जगभरातील नामांकित संस्थाशी सामंजस्य करार करण्यात आले असून, सध्या याची संख्या ११८ वर पोहोचली आहे.

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून हे सामंजस्य करार केले जात आहेत. शैक्षणिक आदान प्रदान, स्टूडंट एक्स्चेंज आणि नवीन अभ्यासक्रमांची निर्मिती अशा तीन पातळीवर हे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. काही सामंजस्य करारामुळे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. गुगलशी झालेल्या कराराचा फायदा ॲप डेव्हलपिंगसाठी होत आहे, तर इन्फोसीसबरोबर झालेल्या कराराचा लाभ विद्यार्थी आणि शिक्षकांना झाला आहे. केवळ शैक्षणिक करार करण्यात आलेले नाहीत. काही महिन्यापूर्वी चप्पल क्लस्टरबरोबर करार करण्यात आला होता, त्या कराराचा एक भाग म्हणून दोन दिवसांपूर्वी येथील चप्पल विक्रेत्यांच्या थेट दुकानात जाऊन त्यांना विद्यापीठातर्फे प्रशिक्षण देण्यात आले. अनेक सामंजस्य करारांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. तंत्रज्ञान अधिविभागातर्फे करण्यात आलेल्या करारामुळे अनेक विद्यार्थ्यांनी बाहेर जाऊन शिक्षण व अनुभव घेतला.

यामध्ये राष्ट्रीय ८१, तर ३७ आंतरराष्ट्रीय सामंजस्य करारांचा समावेश आहे. सध्या ही अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार पूर्णत्वास जाण्याच्या मार्गावर आहेत. त्यांच्या माध्यमातून पुढील काळात विद्यापीठाला अधिकाधिक लाभ व्हावा तसेच त्यांच्या माध्यातून विद्यार्थ्यांना जगभरातील ज्ञानाची कवाडे खुली व्हावीत, यासाठी प्रयत्न केले जात आहेत.



### झालेले एकूण सामंजस्य करार

२०१० : १, २०११: ३ , २०१२ : ८, २०१३ : ९, २०१४ : ८, २०१५ : १२, २०१६ : २२, २०१७ : १०, २०१८ : ३५, २०१९ : ११

### ज्ञानाचे आदान प्रदान

शिवाजी विद्यापीठ आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित संस्था यांच्यामध्ये झालेले नामांकित सामंजस्य करार हे विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी लाभकारक आहेत. या करारामुळे संशोधनास चालना देण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर नामांकित संस्थाशी झालेल्या करारांमुळे ज्ञानाचे आदान प्रदान होण्यास चांगली सुरुवात झाली आहे.

**-डॉ. विलास नांदवडेकर,** कुलसचिव